# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 237/2022 दिनांक : 12.06.2022**

## 1)जबरी चोरी :–

**विमानतळ :–**दिनांक 10.06.2022 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **श्यामनगर दवाखान्याचे बाजुस हर्षनगरकडे जाणारे रोडचे टी पॉईंट जवळ, नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचा एअर फोन व नगदी 900/–रुपये जबरदस्तीने काढुन घेतले तेवढयात दत्ता पाटील खराटे यांना माहिती दिल्याने ते तात्काळ फिर्यादीकडे आले असता लुटमार करणारे मो. सा. सोडुन पळुन गेले थोडया वेळाने लुटमार करणारे त्यांचा मित्र मोटार सायकल घेवून जात असताना खराटे पाटील यांनी त्याला रोखुन विचारपुस करत असताना तो पळुन गेला त्यानंतर सदरची मोटार सायकल फिर्यादी व खराटे पाटील यांनी पोलीस स्टेशन येथे आणुन जमा केली. वगैरे **फिर्यादी मंदार अजय माने, वय 17 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. हर्षनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 199/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री बुरकुले, मो.क्रं. 8830779484** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**मुखेड :–**दिनांक 11.06.2022 रोजी 09.00 वा. चे पुर्वी वेळ नक्की नाही, **बस आगार प्रमुख यांचे निवासस्थानातुन मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयांनी बस आगार प्रमुख यांचे निवास्थानाचे इमारतीचे पाठीमागील पोर्च च्या दरवाजाचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन पोर्चमध्ये ठेवलेले अॅल्युमिनीयम स्लायडिंग खिडक्या व इतर साहित्य एकुण किंमती 40,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी दत्तात्रय गणपतराव कांबळे, वय 44 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. समतानगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 181/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1793 राठोड, मो.क्रं. 9075991793** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**इतवारा :–**दिनांक 11.06.2022 रोजी 14.25 वा. चे सुमारास, **जुना मोंढा गंगासहाय किराणा दुकान, इतवारा, नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही गंगासहाय किराणा दुकान इतवारा नांदेड किराणा दुकानाचे मालक यांची उधारी देण्यासाठी आणलेले पिशवीतील नगदी 71,000/–रूपये व बॅकेचा बावीस हजार रुपयाचा बेअरर चेक कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी रुपा जितेंद्र मक्तेदार, वय 46 वर्षे, व्यवसाय कॅटरिंग रा. पुयणी पाटी वसुंधरा मंगल कार्यालय मालेगाव रोड, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 143/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री मुनीर, मो.क्रं. 9923697166** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 15.05.2022 रोजी 16.36 ते 17.39 वा. चे दरम्यान, **पोस्ट ऑफीस, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पेलंडर कंपनीची मो सा क्रं. एमएच–26/एएक्स.–9382 किमती 40,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अजय मारोती नरवाडे, वय 28 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. राजनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 202/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1673 सिंगे, मो.क्र. 9561038797** हे करीत आहेत.

**2)हदगाव :–** दिनांक 08.06.2022 रोजी 00.00 ते 05.00 वा. चे दरम्यान, **हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपनीची मो सा क्रं. एमएच–26/एजे–0810 किमती 30,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी लक्ष्मीबाई सुधाकर वडारे, वय 75 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. बोरी मुकरी ता. पुसद जि. यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 195/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2342 हंबर्डे, मो.क्र. 9284422052** हे करीत आहेत.

**3)भाग्यनगर :–** दिनांक 30.05.2022 रोजी 22.00 ते दिनांक 31.05.2022 रोजीचे 07.00 वा. चे दरम्यान, **घरामोरुन सहयोगनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पेलंडर कंपनीची काळया रंगाची मो सा क्रं. एमएच–26/एएफ–9357 किमती 10,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी विकास शंकर कुबडे, वय 43 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. सहयोगनगर,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 200/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोना/206 मेलवाड, मो.क्र. 8888802387** हे करीत आहेत.

# 5)गंभीर दुखापत :—

**1)सोनखेड :—**दिनांक 05.06.2022 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतात डेरला शिवार ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचे शेतातील झोपडी जाळुन पळुन जात असताना फिर्यादीने त्यांना तुम्ही माझी झोपडी का जाळली असे विचारले असता आरोपीतांनी फिर्यादीस तुझा मुलगा संतोष यांने श्रषिकेश सोबत लग्नात भांडण का केले तुम्ही लई माजलात असे अश्लिल शिवीगाळ करुन हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचे डावे हातावर मारुन गंभीर दुखापत केली व काठीने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी प्रभु दाजीबा कदम, वय 47 वर्षे, रा. डेरला ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरन 102/2022 कलम 325,294,435,506,34 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1927 भुते, मो. नं. 9421292819** हे करीत आहेत.

**2)उस्माननगर :—**दिनांक 04.06.2022 रोजी 18.00 वा. ते 19.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर मौजे वाळकी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तु माझ्या मेव्हुणा सोबत डोलारा गावला का गेला होतास म्हणुन वाद घालुन फिर्यादीस व त्यांचे पत्नीस थापडा बुक्याने मारहाण केली व फिर्यादीचे आईस उचलुन जमिनीवर आपटल्याने त्यांचे माकडहाड मोडले व फॅक्चर करुन गंभीर दुखापत केली तसेच आरोपीतांनी शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी कचरु मारोती डोंगरे वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. वाळकी बु. ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 122/2022 कलम 325,323,504,506,34 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/2330 कानगुले, मो. नं. 7744019830** हे करीत आहेत.

# 6)प्रोव्हिबीशन :—

**1)किनवट :—** दिनांक 11.06.2022 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **अंध शाळा चे पाठीमागे सार्वजनिक ठिकाणी अंध गल्ली बोधडी बु. ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारु किंमती 3200/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/1805 बाळासाहेब नरोबाजी पांढरे, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 117/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1805 पांढरे, मो.क्र. 7745001805** हे करीत आहेत.

**2)रामतीर्थ :—** दिनांक 11.06.2022 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **पाचपिंपळी शिवार डोणगाव जाणारे रोडवर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारु किंमती 3350/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/अ. लतीफ अ. रहिम, ने. पोस्टे रामतीर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 95/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2476 पठाण, मो.क्र. 9823027725** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड